मानसिक परिपूर्णता

अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका

जुलै २०२०

श्रीमाताजी

मानसिक परिपूर्णता

संपादकीय ०२
पाच आवश्यक गुण.....०३
प्रामाणिकपणा.....१५
अभीप्सा.....१८
समर्पण.....२०
श्रद्धा.....२६
प्रयत्नसातत्य.....३२
प्रतीक आणि त्याचा अर्थ २५

प्रकाशक

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

प्रकाशन स्थळ

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१

वर्गणीसाठी संपर्क क्र : (०४१३)–२२३१७५३

संपादक

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९ ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com

मुद्रक

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१

वर्गणी / देणगीदार सदस्यत्व

१ वर्ष : १८० रू. ३ वर्ष : ५२० रू. ५ वर्ष : ८६० रू. ४००० रू. (देणगीदार)

एका अंकाची किंमत : १५ रू./–

ऑनलाईन वर्गणी वा देणगीसाठी बँकेचा तपशील

बँकेचे नाव : Central Bank of India

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society

IFSC Code : CBIN0281354 A/C No : 1235467709

सूचना : रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

अभीप्सा फेसबुक : @AbhipsaMarathiMasik

अभीप्सा

(Aspiration towards the Divine)

प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।

संपादकीय

योगसाधना म्हणजे काही केवळ तंत्र आणि योगपद्धती नव्हेत; तर योगप्रक्रियेला साहाय्य करणाऱ्या दृष्टिकोनांचादेखील त्यामध्ये समावेश होतो. काही दृष्टिकोन हे श्रीमाताजींच्या शक्तीकार्यास साहाय्यभूत होणारे असतात, तर काही त्या कार्यामध्ये अडथळे निर्माण करणारे असतात. पूर्णयोगासाठी अनिवार्य असणाऱ्या, आपल्या मानसिक परिपूर्णत्वाचा एक भाग असणाऱ्या, काही विशिष्ट अभिवृत्तींचा विचार आपण या अंकात करणार आहोत.

– संपादक, ऑल इंडिया मॅगेझिन

**

(Michelia champaca) सोनचाफा

'अतिमानसिक मनोमय परिपूर्णता'

पाच आवश्यक गुण

अतिमानसिक मनोमय परिपूर्णता

श्रीमाताजी हातामध्ये धरलेल्या फुलाकडे पाहून चिंतनमग्न झाल्या. हे सोनेरी पिवळसर चाफ्याचे फूल आहे. तुम्ही या फुलाकडे नीट पाहिले आहे का? या फुलामध्ये चार चार पाकळ्यांच्या तीन ओळी मिळून बारा पाकळ्या आहेत. याला आपण 'अतिमानसिक मनोमय परिपूर्णता' असे नाव दिले आहे. यामध्ये तीन ओळी असतात, हे माझ्या लक्षात आले नव्हते. एक अगदी छोटी, मग त्याहून काहीशी मोठी आणि त्याहून मोठी असणारी अशी आणखी एक. त्या पाकळ्या चार चारच्या क्रमाने आहेत.

एखाद्याला निसर्गाच्या रूपांमधील प्रतीकात्मकता पाहण्याची इच्छा असेल तर त्याला हे दिसू शकेल की, मध्यभागी परमसत्य आहे आणि मग त्रिविध आविष्करण, कारण चार या आकड्याने आविष्करण दर्शविले जाते. एकावर एक असणारी अशी तीन विश्व : सगळ्यात बाहेरच्या परिघावरच्या पाकळ्या सर्वात मोठ्या आणि हलक्या रंगाच्या – ते म्हणजे भौतिक विश्व, त्यानंतर मग प्राणिक विश्व व मग मानसिक विश्व आणि मध्यभागी अतिमानसिक सत्य.

(CWM 08 : 158)

*

पाच गुण

श्रीमाताजींच्या हातामध्ये पांढऱ्या चाफ्याचे एक फूल आहे, ते त्यांनी दाखविले. या फुलाला श्रीमाताजींनी 'मानसिक परिपूर्णता' असे नाव दिले आहे. (श्रीमाताजी त्या फुलाच्या पाकळ्या मोजतात.) एक, दोन, तीन, चार, पाच मानसिक परिपूर्णता.

श्रीमाताजी : आता या पाच मानसिक परिपूर्णता कोणत्या आहेत? ते पाहू. कारण त्यामध्ये बदल होऊ शकतो. खरंतर, तुम्हाला माझी काही गुपितं सांगायची झाली तर, जेव्हा मी हे फूल कोणालातरी देत असते,

तेव्हा या मानसिक परिपूर्णता प्रत्येक वेळी समानच असतात असे नाहीत. त्या लोकांच्या गरजेवर अवलंबून असतात. अगदी एकाच व्यक्तीला मी जेव्हा वेगवेगळ्या वेळी हे फूल दिलेले असते, तेव्हाही ह्या परिपूर्णता भिन्नभिन्न असू शकतात, त्यामुळे त्या काही निश्चित आहेत असे नाही.

पण ज्यावेळी या फुलाला पहिल्यांदा 'मानसिक परिपूर्णता' हे नाव देण्यात आले होते, त्यावेळी त्या परिपूर्णता कोणकोणत्या त्या लिहून ठेवण्यात आल्या होत्या. पण माझ्यासाठी म्हणाल तर, त्या खूप तरल आहेत. मी तुम्हाला म्हटले त्याप्रमाणे त्या परिस्थिती आणि गरजा यांवर अवलंबून असतात. पहिल्या वेळी कोणत्या परिपूर्णता लिहिण्यात आल्या होत्या, ते आत्ता मला स्मरत नाही. जर कोणाला आठवत असतील, तर त्याने त्या सांगाव्यात.

शिष्य : अभीप्सा, भक्ती, प्रामाणिकता, श्रद्धा आणि समर्पण....

श्रीमाताजी : प्रामाणिकपणा किंवा पारदर्शकता. मी कोणालाही जेव्हा हे फूल देते, तेव्हा इतर कोणत्या परिपूर्णता त्यात असतील नसतील, पण प्रामाणिकपणा ही परिपूर्णता त्यामध्ये अवश्य असते. त्या सगळ्यांमध्ये पहिली आवश्यक कोणती गोष्ट असेल, तर ती असते प्रामाणिकपणा! कारण जर प्रामाणिकपणा नसेल, तर व्यक्ती अर्धे पाऊलसुद्धा पुढे टाकू शकणार नाही. त्यामुळे प्रामाणिकपणा ही पहिली पूर्णता आहे आणि ती नेहमीच असते. जर तुम्हाला त्याचा दुसऱ्या शब्दामध्ये अनुवादच करायचा असेल, तर तुम्ही हवे तर त्याला पारदर्शकता म्हणू शकता.

मी याचे थोडे अधिक स्पष्टीकरण करते. कोणी एखादी व्यक्ती माझ्यासमोर उभी असते आणि मी त्या व्यक्तीकडे, तिच्या डोळ्यांमध्ये बघत असते. आणि जर ती व्यक्ती प्रामाणिक असेल म्हणजे पारदर्शक असेल तर तिच्या डोळ्यांमधून, आतवर उतरून, मी तिचा आत्मा स्पष्टपणे पाहू शकते. हा नेमका असा एक अनुभव असतो – पण मी कोणा एखाद्या व्यक्तीकडे बघते आणि मला तेथे काहीसे ढग दिसतात,

मी पाहणे चालूच ठेवते, मग मला पडदा दिसतो आणि मग नंतर कधीतरी एक भिंत दिसते आणि नंतर काहीतरी काळे असे दिसते आणि मला हे सगळे ओलांडून पलीकडे जावे लागते, पलीकडे जाण्यासाठी मला त्यात छिद्रे पाडावी लागतात. आणि एवढे करूनही मला खात्री नसते की, न जाणो, शेवटच्या क्षणी मी एखाद्या कांस्य धातूच्या कठीण दरवाजासमोरच उभी राहिलेली असायची आणि त्यातून पलीकडे जाऊन, त्याचा आत्मा पाहूच शकणार नाही, अशा स्थितीत असायची. तेव्हा अशा व्यक्तीच्या बाबतीत मी अगदी ताबडतोब सांगू शकते की, ही व्यक्ती प्रामाणिक नाहीये. लाक्षणिक अर्थाने सांगावयाचे झाले तर मी असे म्हणू शकते की, ती व्यक्ती पारदर्शक नाहीये. ही झाली पहिली गोष्ट.

श्रद्धा किंवा विश्वास, ही दुसरी गोष्ट. अर्थातच व्यक्तीला प्रगती करण्याची इच्छा असेल तर, श्रद्धा ही अगदी अनिवार्य आवश्यक अशी गोष्ट आहे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर, अर्थात हा काहीसा मर्यादित अर्थ आहे, पण माझ्या दृष्टीने तो महत्त्वाचा आहे. कारण (हा अनुभवाचा भाग आहे) जर तुमची श्रद्धा पूर्ण विश्वासयुक्त नसेल तर, तुमची ईश्वरावर श्रद्धा आहे, अशा समजुतीमध्ये तुम्ही खुशाल राहू शकाल परंतु तरीही ईश्वरी शक्तीवरील किंवा ईश्वरी कल्याणकारितेवरील किंवा तुमच्यामध्ये ईश्वराचा निवास आहे, यावरील तुमचा विश्वास तुम्ही गमावलेला असू शकतो.

तीन प्रकारचे अडथळे असतात : लोक ज्याला 'ईश्वरावरील अविचल श्रद्धा' असे म्हणतात, अशी श्रद्धा असणाऱ्या काही व्यक्ती असतात. त्या म्हणतात, ''सारे काही ईश्वरच घडवीत आहे, तो काहीही करू शकतो; माझ्यामध्ये किंवा इतरांमध्ये किंवा इतरत्र जे जे काही घडत आहे ते ते सारे ईश्वराचे आणि केवळ ईश्वराचेच कर्म आहे.'' आणि याला जर त्यांनी एक प्रकारच्या तर्कबुद्धीची जोड दिली तर, जगामध्ये घडणाऱ्या साऱ्या भयानक गोष्टींबद्दलही ते ईश्वरालाच दोष देऊ लागतात

आणि त्याला अक्षरशः एक अत्यंत निर्दयी, भीतिदायक सैतानच बनवून टाकतात. जर त्यांचा विश्वास नसेल तर, हे असे घडते.

किंवा असेही घडते, त्यांची श्रद्धा असते पण ते स्वतःशीच म्हणतात, ''खरंतर, माझी ईश्वरावर किती श्रद्धा आहे; पण हे जग असे कसे आहे? पहिली गोष्ट म्हणजे, मला किती त्रास सहन करावा लागत आहे, नाही का? मी खूप दुःखी आहे, माझ्या शेजाऱ्यापाजाऱ्यांपेक्षा मी खरंच खूप दुःखी आहे.'' – हो, कारण व्यक्ती नेहमीच त्याच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांपेक्षा स्वतःला दुःखी समजत असते. – ''मी दुःखी आहे आणि हे जग माझ्याशी दुष्टाव्याने वागते. पण ईश्वर तर ईश्वर आहे ना? तो सर्वकल्याणकारक आहे, तो म्हणजे सर्व–उदारता आहे, तो म्हणजे सर्व–सुसंवाद आहे आणि मग तरीही मी मात्र इतका दुःखी का बरे? तो सामर्थ्यशाली असूनही, मला एवढे दुःख का भोगायला लावतो?'' हा दुसरा अडथळा आहे.

आणि आता तिसरा अडथळा : काही लोक असेही असतात की, ज्यांच्याकडे काहीशी विकृत किंवा अत्याधिक विनम्रता, विनय असतो आणि ते स्वतःशीच म्हणतात, ''नक्कीच ईश्वराने मला हाकलून दिलेले दिसते, मी कुचकामी आहे, तो माझे काहीच करू शकत नाही, मी एकच गोष्ट करू शकतो ती म्हणजे मी त्याचा नादच सोडून दिला पाहिजे कारण मी त्याच्यासाठी अपात्र आहे, असे त्याला वाटत असले पाहिजे.'' अशा वेळी, व्यक्तीने श्रद्धेला ईश्वरी कृपेवरील समग्र आणि परिपूर्ण विश्वासाची जोड दिली नाही तर, अशा अडचणी येतात. तेव्हा श्रद्धा आणि विश्वास या दोन्ही गोष्टी आवश्यक असतात.

भक्ती किंवा कृतज्ञता. या मालिकेमध्ये आता आपण भक्तीचा समावेश केला आहे. तर, भक्ती ही चांगलीच गोष्ट आहे, पण जर तिच्यासोबत इतर काही गोष्टी नसतील तर, तेव्हाही अनेक चुका घडण्याची शक्यता असते. तेव्हा अनेक मोठमोठ्या अडचणी येऊ शकतात.

तुमच्यामध्ये भक्तीभावना असते आणि तरीही तुम्ही तुमचा अहंकारही सांभाळत राहता.

आणि नंतर मग हा अहंकारच तुम्हाला भक्तीच्या माध्यमातून अनेक प्रकारच्या गोष्टी करायला भाग पाडतो, अगदी अत्यंत अहंकारी गोष्टीसुद्धा! म्हणजे असे की, तुम्ही फक्त तुमचाच विचार करत राहता, इतरांचा नाही, जगाचा नाही, कार्याचाही नाही किंवा जे करावयास हवे त्याचाही नाही तर, तुम्ही फक्त तुमच्या भक्तीचाच विचार करत राहता आणि त्यामुळेच तुम्ही प्रचंड अहंकारी बनून जाता. आणि म्हणून, जेव्हा तुम्हाला असे आढळते की, ईश्वर कोणत्याही कारणाने म्हणा पण, तुम्हाला अपेक्षित आहे तेवढ्या उत्साहाने तुमच्या भक्तीला प्रतिसाद देत नाही तेव्हा, तुम्ही निराश होता आणि मी आत्ता ज्या तीन गोष्टी सांगितल्या त्यामध्येच अडकून राहाता.

म्हणजे एकतर ईश्वर निष्ठुर आहे – आपण अशा गोष्टी वाचल्या आहेत. उत्साही भक्तांच्या अशा कितीतरी गोष्टी असतात. असे उत्साही भक्त ईश्वरावर टिका करू लागतात. कारण ईश्वर आता त्यांच्याबाबतीत पूर्वीप्रमाणे जवळचा, प्रेमळ उरलेला नसतो, तो निघून गेलेला असतो. मग असा भक्त म्हणू लागतो, ''तू मला उजाड करून का गेलास? तू मला असे टाकून का गेलास? तू खूप निष्ठुर आहेस.'' त्या माणसांमध्ये असे म्हणण्याचे धाडस नसते पण ते असा विचार करत असतात, किंवा मग ते म्हणतात, ''मी नक्कीच काहीतरी घोर पातक केले असले पाहिजे आणि म्हणूनच ईश्वराने मला दूर लोटले आहे.'' आणि मग ते निराशेच्या गर्ततेमध्ये जाऊन पडतात.

श्रद्धेसोबत एक स्पंदनही असावयास हवे. एक अशी कृतज्ञतेची भावना हवी की, ईश्वर अस्तित्वात आहे. ईश्वर अस्तित्वात आहे, ही एक प्रकारची अद्‌भुत कृतज्ञतेची भावना तुम्हाला एक प्रकारच्या उत्कट आनंदाने भारून टाकते. ह्या विश्वामध्ये दिसणारा भयानकपणाच फक्त

अस्तित्वात आहे असे नाही तर, या विश्वामध्ये ईश्वर म्हणूनही काहीतरी अस्तित्वात आहे, हो, येथे ईश्वर आहे, ईश्वरी अस्तित्व आहे. जेव्हा कधी, अगदी एखादी छोटीशीही गोष्ट, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे त्या ईश्वरीय अस्तित्वाच्या उदात्त वास्तवाशी तुमचा संपर्क घडविते तेव्हा, त्या प्रत्येक वेळी, तुमचे हृदय अगदी उत्कट, अगदी अद्‌भुत आनंदाने, कृतज्ञतेने भरून जाते. बाकी सर्व गोष्टींच्या तुलनेत अशी कृतज्ञता म्हणजे सर्वाधिक आनंददायी गोष्ट असते. दुसरी कोणतीच गोष्ट तुम्हाला कृतज्ञतेइतका आनंद देऊ शकत नाही.

व्यक्ती एखाद्या पक्षाचे गाणे ऐकते, एखादे सुंदरसे फूल पाहते, एखाद्या लहानग्या बालकाकडे पाहते, उदारतेची एखादी कृती पाहते, एखादे चांगलेसे वाक्य वाचते, मावळत्या सूर्याकडे पाहते, असे काहीही असू शकते, अवचितपणे ते तुमच्या समोर येते आणि मग, हे विश्व ईश्वराची अभिव्यक्ती करत आहे, या विश्वापाठीमागे असे काहीतरी आहे की, जे ईश्वरी आहे ह्यासारखी उत्कट, गाढ, तीव्र अशी भावना मनात दाटून येते. म्हणून कृतज्ञतेविना भक्ती ही अपूर्ण आहे; भक्तीसोबत कृतज्ञताही असावयास हवी.

अभीप्सा किंवा धैर्य – मला आठवते की, आपण एकदा एक परिपूर्णता म्हणून धैर्याचा उल्लेख केला होता. मी एकदा यादीमध्ये देखील त्याचा समावेश केला होता असे मला आठवते. पण येथे धैर्याचा अर्थ 'परम साहसाविषयीची आवड असणे' असा आहे. आणि परम साहसाची ही आवड म्हणजे अभीप्सा. अशी अभीप्सा की जी, तुमचा पूर्णपणे ताबा घेते आणि कोणताही मागचा पुढचा विचार न करता, हातचे काहीही राखून न ठेवता, परतीच्या साऱ्या शक्यता नसतानाही, तुम्हाला ईश्वरी शोधाच्या महान साहसासाठी झोकून देण्यास प्रवृत्त करते; ईश्वर–भेटीसाठीच्या महान साहसासाठी आणि त्याहूनही अधिक महान अशा ईश्वरी साक्षात्काराच्या साहसासाठी तुम्हाला झोकून देण्यास प्रवृत्त करते.

''पुढे काय होईल?'' याविषयी एक क्षणभरही शंका उपस्थित न करता, मागे वळून न पाहता या साहसामध्ये तुम्ही स्वतःला झोकून देता. कारण, पुढे काय होईल असा जर तुम्ही विचार करत बसलात, तर तुम्ही कधीच सुरुवात करू शकणार नाही. तुम्ही तिथेच खिळून राहता. त्याच ठिकाणी जखडलेले राहता, तुम्हाला काहीतरी गमावण्याची भीती वाटत राहाते, तुम्हाला तुमचा तोल जाण्याची भीती वाटत राहते. म्हणूनच मी धैर्याविषयी बोलले, पण खरंतर ती अभीप्सा असते. धैर्य आणि अभीप्सा या गोष्टी हातात हात घालून नांदतात. खरीखुरी अभीप्सा ही धैर्ययुक्त असते.

समर्पण – श्रीअरविंदांनी म्हटले आहे की, समर्पण ही योगसाधनेसाठी आवश्यक असणारी पहिली आणि एकमेव अट आहे. जर आपण ते सांगत आहेत त्याप्रमाणे वागू लागलो तर, समर्पण हा अनेक गुणांपैकी एक गुण आहे असे समजू नका, तर तो योगसाधनेची सुरुवात करण्यासाठी अगदी अनिवार्य आवश्यक असणारा पहिला दृष्टिकोन आहे, हे लक्षात घ्या. व्यक्तीने संपूर्ण समर्पण करायचा निश्चय केलेला नसेल, तर व्यक्ती योगसाधनेची सुरुवातच करू शकत नाही.

सहनशीलता किंवा प्रयत्नसातत्य – परंतु समर्पण जर समग्र व्हावयाचे असेल, तर सहनशीलता किंवा प्रयत्नसातत्य हे गुण आवश्यकच आहेत. आत्तापर्यंत आपण चारच गुण विचारात घेतले आहेत; तर आता मी त्यामध्ये सहनशीलतेचा समावेश करते. कारण जर नाउमेद न होता किंवा सोडून न देता, तुम्ही अडचणींना सामोरे जाऊ शकत नसाल तर, उदाहरणार्थ, अमुक एक गोष्ट खूपच कठीण आहे असे म्हणून, तुम्ही ती करू शकत नसाल तर... म्हणजे धक्केचपेटे बसत आहेत, पण तरीही तुम्ही त्या गोष्टी खिशात घालून, तशीच वाटचाल करत राहत असाल तर – म्हणजे जसे म्हटले जाते की, तुमच्यातील एखाद्या दोषाचा परिणाम म्हणून तुम्हाला टक्केटोणपे खावे लागलेले असतात आणि तरीही त्याकडे लक्ष न देता, तुम्ही तसेच पुढे चालत राहाल तर, तुम्ही फार दूरवर जाऊ

शकत नाही. जेव्हा तुम्ही तुमच्या सवयीच्या असलेल्या जीवनापासून दूर जाता, तेव्हा पहिल्याच वळणावर तुम्ही निराशेच्या गर्ततेमध्ये जाऊन पडता आणि नाद सोडून देता.

याचेच सर्वात भौतिक रूप म्हणजे प्रयत्नसातत्य हे आहे. गरज पडली तर, एखादी गोष्ट हजार वेळा सुरु करण्याची जरी वेळ आली, तरी ती करण्याचा निश्चय करावयास हवा. माणसं अगदी निराश होऊन माझ्याकडे येतात आणि म्हणतात, ''मला वाटलं होतं की, आता सगळं काही झालं आहे; पण आता मला पुन्हा नव्याने सुरुवात करावी लागणार.'' परंतु जर त्यांना असे सांगितले की, ''पण हे तर काहीच नाही. तुम्हाला कदाचित तीच गोष्ट शंभर नाही, दोनशे वेळा, कदाचित हजार वेळासुद्धा करावी लागेल. तुम्ही नुकतेच कुठे एक पाऊल पुढे टाकता आणि असे समजायला लागता की, तुम्ही सुरक्षित आहात, परंतु नेहमीच असे काहीतरी असते की, तुम्ही थोडेसे पुढे गेल्यावर तीच अडचण फिरुन परत येते.'' तुम्हाला असे वाटते की, तुम्ही प्रश्न सोडवला आहे, समस्या सोडविली आहे. पण तुम्हाला पुन्हा एकदा तोच प्रश्न, तीच समस्या सोडवायला लागते. ती दिसायला कदाचित काहीशी भिन्न दिसते पण समस्या तीच असते. अशावेळी ''अगदी जरी ती समस्या लाखो वेळा आली तरी मी ती लाख वेळा परतवून लावेन, परंतु मी त्यातून पार पडेनच,'' असा निश्चय जर तुम्ही केलेला नसेल, तर तुम्ही योग करूच शकणार नाही. ही अगदी अनिवार्य अशी गोष्ट आहे.

लोकांना चांगले चांगले अनुभव येतात आणि ते म्हणतात, ''वा, हेच तर हवे होते.'' आणि मग हळूहळू ते अनुभव स्थिरावू लागतात, नाहीसे होतात, कधीकधी झाकोळले जातात आणि मग अचानकपणे कधीतरी एकदम अनपेक्षित असे काहीतरी, अगदीच सामान्य असे आणि वरकरणी पाहता स्वारस्य वाटणार नाही, असे काहीतरी तुमच्या समोर येते आणि मार्ग अडवून धरते. आणि मग तुम्ही म्हणू लागता, ''हे काय हे? जर

परत तेच सगळे सुरू करायचे असेल, तर मी आजवर एवढी प्रगती केली, त्याचा काय उपयोग? मी हे कशासाठी करायचे? मी एवढे प्रयत्न केले, मला यशही मिळाले, मी काहीतरी साध्यही करून घेतले आणि आता मात्र असे भासते आहे की, मी आजवर काहीच केले नाहीये. त्याचा काहीच उपयोग नाहीये.'' याचा अर्थ असा की, तुमच्याकडे चिकाटी नाहीये. जर व्यक्तीकडे चिकाटी असेल तर ती म्हणते, ''ठीक आहे. मी जितक्या वेळेला आवश्यकता पडेल तितक्या वेळेला पुन्हा सुरुवात करेन. हजार वेळा, दहा हजार वेळा, गरज पडली तर लाख वेळासुद्धा. मी पुन्हा नव्याने सुरुवात करेन. पण मी माझ्या ध्येयाप्रत पोहोचेनच आणि कोणतीच शक्ती मला या मार्गावर रोखू शकणार नाही.'' ही खूप आवश्यक गोष्ट आहे, अगदी आवश्यक.

म्हणून मला असे वाटते की, आपण या यादीमध्ये सर्वात प्रथम समर्पण लिहू. श्रीअरविंद म्हणाले त्याप्रमाणे, पूर्णयोग करावयाचा असेल तर व्यक्तीने प्रथमतः ईश्वराप्रत समग्र समर्पण करण्याचा निर्धार करावयास हवा, अन्य कोणताही मार्ग नाही. केवळ हाच एक मार्ग आहे. पण त्यानंतर पाच मानसिक गुण, पाच मानसिक परिपूर्णता असायला पाहिजेत आणि या परिपूर्णता अशा : प्रामाणिकपणा किंवा पारदर्शकता, श्रद्धा किंवा विश्वास (अर्थातच, ईश्वरावरील विश्वास), भक्ती किंवा कृतज्ञता, धैर्य किंवा अभीप्सा, चिकाटी किंवा प्रयत्नसातत्य.

चिकाटीचे एक रूप म्हणजे निष्ठा आहे, स्वतःच्या संकल्पाशी प्रामाणिक असणे, एकनिष्ठ असणे. व्यक्तीने एकदा निश्चय केला की, मग त्याच्याशी दृढ राहिले पाहिजे. ही चिकाटी होय. आणि जर व्यक्ती अशा रीतीने प्रयत्नसातत्य राखेल, तर एक वेळ अशी येते, जेव्हा व्यक्ती विजयी झालेली असते. आणि विजय हा सर्वात दीर्घस्थायी असतो.

(CWM 08 : 36-42)

*

आत्मदान

जर व्यक्ती विश्वासाने आणि खात्रीपूर्वक ईश्वराप्रत आत्मदान करेल तर ईश्वराकडून तिच्यासाठी सारे काही केले जाईल; पडदे हटवले जातील, आंतरिक चेतना जागृत केली जाईल, हृदय आणि प्रकृती शुद्ध केली जाईल. हे व्यक्तीला अगदी एकदम पूर्णत्वाने जरी करता आले नाही तरी, व्यक्ती जेवढे ते अधिकाधिक करेल, तेवढ्या अधिकाधिक प्रमाणात तिला आंतरिक साहाय्य आणि मार्गदर्शन लाभत राहील आणि अंतरंगामध्ये ईश्वराचा संपर्क आणि त्याची अनुभूती चढती–वाढती राहील. तुमच्यामधील शंका घेणारे मन कमी सक्रिय बनले आणि तुमच्या मध्ये विनम्रता व समर्पणाची इच्छा जर वाढीला लागली तर, हे घडून येणे निश्चितपणे शक्य आहे. त्यासाठी या व्यतिरिक्त, इतर कोणत्याच तपस्येची आणि सामर्थ्याची आवश्यकता नाही.

(CWSA 29 : 69)

*

योगसाधनेचा गाभा

व्यक्तीला जर ईश्वर हवा असेल तर, व्यक्तीच्या हृदयाची शुद्धीकरण प्रक्रिया पण ईश्वरानेच हाती घ्यावी आणि त्यानेच साधना विकसित करावी आणि त्याला आवश्यक असे अनुभवही ईश्वरानेच त्याला देऊ करावेत, ही जी तुमची योगाविषयीची आधीची कल्पना होती, त्याला अनुलक्षून उत्तर देताना, मी तसे लिहिले होते. मला असे म्हणावयाचे होते की, असे होणे शक्य आहे आणि असे घडूनही येते.

पण त्यासाठी त्या व्यक्तीचा ईश्वरावर विश्वास असावयास हवा, भरवसा असावायास हवा आणि समर्पणाची इच्छा असावयास हवी. कारण, ईश्वराने सारे काही हाती घेण्यामध्ये, व्यक्तीने केवळ स्वतःच्या प्रयत्नांवर न विसंबता, स्वतःला ईश्वराच्या हाती सोपविणे अंतर्भूत आहे. यामध्ये व्यक्तीची सारी श्रद्धा आणि विश्वास ईश्वरावरच असणे आणि

त्याने उत्तरोत्तर आत्मसमर्पण प्रगत करत राहणे अभिप्रेत आहे. खरंतर, हेच साधनेचे तत्त्व आहे आणि तेच मी स्वतःही अनुसरलेले आहे. माझ्या दृष्टीने तरी, योगसाधनेचा हा गाभा आहे. मला वाटते, रामकृष्णांनी मांजराच्या पिल्लाची जी प्रतिमा वापरली आहे, ती पद्धत हीच आहे. पण सगळ्यांना हा मार्ग एकदमच अनुसरता येत नाही. इथपर्यंत येऊन पोहोचण्यासाठी त्यांना वेळ लागतो. जेव्हा मन आणि प्राण शांत होतात तेव्हा मग हा मार्ग अधिक विकसित होतो.

(CWSA 29 : 70)

*

अनिवार्य आवश्यक गुण

ज्या गुणांबद्दल तुम्ही बोलत आहात, ते गुण आध्यात्मिक मार्गाकडे घेऊन जाण्यासाठी साहाय्यभूत होणारे आहेत आणि ज्या दोषांचा तुम्ही उल्लेख केलात, ते सगळे दोष म्हणजे मार्गामधील अतिशय गंभीर असे अडथळे आहेत.

आध्यात्मिक प्रयत्नांसाठी प्रामाणिकपणा ही अगदी अत्यावश्यक गोष्ट आहे आणि कुटिलता हा कायमस्वरूपी अडथळा आहे. सात्विक प्रवृत्ती ही आध्यात्मिक जीवनासाठी नेहमीच योग्य आणि तयार अशी मानण्यात आली आहे, तर राजसिक प्रवृत्ती ही मात्र इच्छाआकांक्षाच्या भाराने दबून जाते. त्याच वेळी हेही खरे आहे की, आध्यात्मिकता ही गोष्ट द्वंद्वातीत असते आणि त्यासाठी जर का कशाची आवश्यकता असेलच तर ती, ऊर्ध्वमुख अभीप्सेची असते.

आणि ही अभीप्सा सात्विक प्रवृत्तीच्या व्यक्तीइतकीच राजसिक प्रवृत्तीच्या व्यक्तीमध्येही उदित होऊ शकते. जशी एखादी सात्विक प्रवृत्तीची व्यक्ती तिच्या गुणांच्या अतीत होऊ शकते तशीच, राजसिक प्रवृत्तीची व्यक्तीही तिच्या अवगुणांच्या, इच्छाआकांक्षांच्या अतीत होऊन, ईश्वरी शुद्धता, प्रकाश आणि प्रेमाप्रत वळू शकते. अर्थात, जेव्हा व्यक्ती

स्वतःच्या कनिष्ठ प्रकृतीवर विजय प्राप्त करून घेईल आणि स्वतःमधून ती फेकून देईल तेव्हाच ही गोष्ट घडून येईल. कारण ती जर पुन्हा कनिष्ठ प्रकृतीमध्ये जाऊन पडली, तर ती व्यक्ती मार्गभ्रष्ट होण्याची पण शक्यता असते किंवा अगदीच काही नाही तर, जोपर्यंत ती त्यामध्ये रमलेली असते तोपर्यंत तिची आंतरिक प्रगती खुंटते.

परंतु धार्मिक आणि आध्यात्मिक इतिहासामध्ये, मोठमोठ्या गुन्हेगारांचे महान संतांमध्ये किंवा अवगुणी वा कमी गुणवान व्यक्तींचे आध्यात्मिक साधकांमध्ये आणि भक्तांमध्ये रुपांतर होताना वारंवार आढळून आले आहे. उदाहरणार्थ युरोपमध्ये सेंट ऑगस्टिन, भारतामध्ये चैतन्याचे जगाई आणि मधाई, बिल्वमंगल आणि त्यासारखी अनेक उदाहरणे आहेत. जो कोणी ईश्वराच्या घराचे दरवाजे अगदी प्रामाणिकपणे ठोठावतो, त्याच्यासाठी ते कधीच बंद नसतात मग त्या माणसाच्या भूतकाळातील ठोकरा किंवा चुका किती का असेनात. मानवी गुण आणि मानवी दोष म्हणजे अंतरंगात असणाऱ्या ईश्वरी तत्त्वावर अनुक्रमे असणारी तेजस्वी व काळोखी आवरणे होत. पण जेव्हा ही आवरणे भेदली जातात तेव्हा, आत्म्याच्या उंचीप्रत जाताना, ती दोन्ही चांगली पोळून निघतात.

ईश्वरासमोरील विनम्रता ही देखील आध्यात्मिक जीवनाची एक अनिवार्य अट आहे आणि आध्यात्मिक गर्व, उद्धटपणा किंवा घमेंड आणि स्वतःवरील फाजील विश्वास या गोष्टी नेहमीच खाली खेचणाऱ्या असतात. परंतु या मार्गावरील अडचणी लक्षात घेता, ईश्वरावरील विश्वास आणि स्वतःच्या आध्यात्मिक नियतीवरील श्रद्धा (म्हणजे, मी अंतःकरणपूर्वक, जीवाच्या निकराने ईश्वराचा शोध घेत आहे त्यामुळे एक ना एक दिवस मी त्याच्यापर्यंत पोहोचेनच हा विश्वास) या गोष्टी खूपच आवश्यक असतात.

ईश्वर सगळ्यांमध्येच असल्यामुळे, इतरांचा तिरस्कार करणे या गोष्टीला येथे थाराच नाही. अंतिमतः, माणसाच्या कृती आणि आकांक्षा या कधीच क्षुल्लक आणि निरुपयोगी असत नाहीत कारण, सगळे जीवन

म्हणजेच अंधकारातून प्रकाशाकडे चाललेली जीवाची वाटचाल असते.

आमचा दृष्टिकोन असा आहे की, राजकारण, सामाजिक सुधारणा, परोपकार यांसारख्या मानवाने स्वीकारलेल्या कोणत्याही सामान्य मार्गाने, मानवता स्वतःच्या मर्यादांच्या पलीकडे जाऊ शकणार नाही. कारण ह्या सगळ्या गोष्टी म्हणजे तात्पुरती केलेली मलमपट्टी असते. यातून खरी सुटका ही जाणिवेमध्ये परिवर्तन झाल्यावरच घडून येते; व्यक्ती आपल्या जीवाच्या अधिक महान, अधिक व्यापक आणि अधिक विशुद्ध अशा पद्धतीत परिवर्तित होईल आणि त्यावर आधारित कृती करू लागेल, जीवन जगू लागेल तेव्हाच यामधून सुटका घडून येते. एकदा का आध्यात्मिक दिशा निश्चित झाली की मग, व्यक्तीने आपली सारी ऊर्जा त्या दिशेनेच वळविली पाहिजे.

(CWSA 29 : 42-43)

**

प्रामाणिकपणा

प्रामाणिकपणा म्हणजे काय?

जी एकमेव अनिवार्य आवश्यक अट आहे आणि ती म्हणजे प्रामाणिकपणा.

*

प्रामाणिकपणा म्हणजे काय? प्रामाणिकपणा म्हणजे कोणत्याही कनिष्ठ शक्तींचे प्रभाव न स्वीकारता, केवळ ईश्वरी प्रभावच स्वीकारणे.

*

सर्वथा ईश्वराकडेच वळणे आणि केवळ ईश्वरी आवेगच तेवढे स्वीकारणे म्हणजे प्रामाणिकपणा. तसे बनण्याची खरीखुरी, सततची इच्छा आणि त्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे प्रामाणिकपणा होय.

*

प्रामाणिकपणा म्हणजे तुमची इच्छा ही खरीखुरी इच्छा असली

पाहिजे. ''मी अभीप्सा बाळगतो'' असा जर का तुम्ही नुसताच विचार कराल आणि त्या अभीप्सेशी विसंगत अशा गोष्टी करत राहाल किंवा तुमच्या स्वतःच्या इच्छावासनांचीच पूर्ती करत राहाल किंवा स्वतःला विरोधी असणाऱ्या प्रभावांना खुले कराल, तर ती इच्छा प्रामाणिक नाही, असे समजावे.

*

प्रामाणिकपणा म्हणजे ईश्वराभिमुख असलेल्या सर्वोच्च अभीप्सेला, विरोध करण्यास आपल्यामधील कोणत्याच भागाला संमती न देणे.

*

सर्व प्रामाणिक अभीप्सेचा परिणाम नक्कीच होतो; जर तुम्ही प्रामाणिक असाल तर तुम्ही ईश्वरी जीवनामध्ये उन्नत होता. पूर्णपणे प्रामाणिक असणे म्हणजे – फक्त आणि फक्त ईश्वरी सत्याचीच अभीप्सा बाळगणे; दिव्य मातेप्रत स्वतःला अधिकाधिक समर्पित करणे; या अभीप्सेव्यतिरिक्त असणाऱ्या वैयक्तिक सर्व मागण्या व वासना यांचा परित्याग करणे; जीवनातील प्रत्येक कृती ही ईश्वरालाच समर्पण करणे आणि कोणताही अहंकार आड येऊ न देता, ते कार्य ईश्वराने दिलेले आहे असे मानून कार्य करणे. हाच दिव्य जीवनाचा पाया आहे. व्यक्ती एकाएकी एकदम अशी होऊ शकत नाही. पण जर ती सातत्याने तशी अभीप्सा बाळगेल आणि ईश्वरी शक्तीने साहाय्य करावे म्हणून तिचा अगदी अंतःकरणपूर्वक आणि साध्यासरळ इच्छेने, नेहमी धावा करत राहील; तर व्यक्ती या चेतनेप्रत अधिकाधिक उन्नत होत राहते.

(CWSA 29 : 50-51)

*

साधनेमधील प्रामाणिकपणा

माणसं नेहमीच जटिल असतात आणि त्यांच्या प्रकृतीमध्ये, त्यांचे गुण व दोष परस्परांमध्ये इतके मिसळलेले असतात की, ते वेगळे करता

येणे जवळजवळ अशक्य असते. व्यक्तीला स्वतः आपण जसे असावेसे वाटत असते किंवा इतरांनी आपल्याकडे जसे बघावेसे वाटत असते किंवा व्यक्तीचा कल कधी तिच्या स्वभावाच्या एका बाजूने झुकलेला असतो तेव्हा ती जशी असते तेव्हाची ती आणि ती व्यक्ती वास्तवात जशी असते किंवा इतरांशी संबंधित असताना जशी असते, किंवा स्वभावाच्या दुसऱ्याच बाजूने वागत असताना ती जशी असते, या गोष्टींमध्ये खूप अंतर असू शकते.

मानवी प्रकृतीच्या दृष्टीने पाहता, पूर्णपणे प्रामाणिक असणे, सरळमार्गी असणे, खुले असणे ही काही साधीसोपी उपलब्धी नाही. केवळ आध्यात्मिक प्रयासांनीच ही गोष्ट साध्य होऊ शकते. त्यासाठी अगदी कठोर अशी आत्मपरीक्षणात्मक अंतर्दृष्टी असली पाहिजे, त्याच्याकडे आत्मनिरीक्षणाची स्वसमर्थन न करणारी चिकित्सा आवश्यक आहे. आणि भल्या भल्या साधकांकडे किंवा योग्यांकडेदेखील ही क्षमता नसते. केवळ प्रदीप्त अशा ईश्वरी कृपेमुळेच, साधकाला स्वतःचा शोध लागतो आणि त्याच्यामध्ये ज्या कमतरता असतात, त्या भरून काढून, त्याचे परिवर्तन घडविण्याची क्षमता केवळ त्या ईश्वरी कृपेमध्येच असते. आणि हे सुद्धा केव्हा शक्य होते? तर जेव्हा साधक ईश्वरी कार्यासाठी स्वतःला समर्पित करू पाहतो आणि तसे करण्यास तो सहमती देतो तेव्हाच हे घडून येते.

*

सरळमार्गीपणा म्हणजे स्वतःशी आणि ईश्वराशी अगदी साधेसुधेपणाने सचोटीने वागणे आणि व्यक्तीने वागण्याच्या पद्धतीमध्ये कुटिलता न बाळगणे. स्वसमर्थन म्हणजे स्वतःची चूक ओळखण्याची अनिच्छा आणि श्रीमाताजींनी सांगूनदेखील, त्यांच्याशी प्रतिवाद करत, आपणच कसे बरोबर आहोत हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे स्वसमर्थन होय.

(CWSA 29 : 51, 54)

**

अभीप्सा

अभीप्सेचे मोल

हृदयापासून केलेला साधा, सरळ, प्रामाणिक धावा आणि अभीप्सा हीच एक महत्त्वाची गोष्ट आहे आणि ती गोष्ट क्षमतांपेक्षाही अधिक आवश्यक आणि अधिक प्रभावी असते.

*

व्यक्तीने जितके शक्य आहे तितके स्वतःला श्रीमाताजींच्या शक्तीप्रत खुले राखणे आणि प्रामाणिकपणे अभीप्सा बाळगणे आवश्यक आहे. मग कितीही अडचणी आल्या तरीही त्यावर मात करता येते – कदाचित त्याला काही वेळ लागेल पण परिणामाची खात्री असते.

*

श्रीमाताजींची शक्ती आपल्या अवतीभोवती सर्वत्र आहे असे समजून, ती आत प्रविष्ट व्हावी म्हणून व्यक्तीने तिचा धावा करावयास हवा. जर व्यक्तीला तशी खरीच जाणीव झाली तर उत्तमच, पण जरी तसे झाले नाही तरीही व्यक्तीची श्रद्धा असेल आणि त्या धाव्यामध्ये शक्ती असेल तरीही, श्रीमाताजींची शक्ती आत प्रवाहित होऊ शकते.

*

व्यक्तीने ईश्वरावर विसंबून असावे आणि त्यासोबतच काही सक्षम साधनासुद्धा करावी. साधनेच्या प्रमाणात नव्हे तर, जीवाच्या आणि त्याच्या अभीप्सेच्या प्रमाणात, ईश्वर त्याचे फल प्रदान करतो. चिंता करत बसणे देखील उपयोगाचे नाही. ''मी असा होईन, मी तसा होईन, मी कसे असावे बरे?'' याऐवजी, ''मला मी काय व्हावेसे वाटते यासाठी नाही तर, ईश्वराला मी कोण बनणे अपेक्षित आहे, तसे व्हावयास मी तयार आहे'' असे म्हणणे आवश्यक आहे आणि बाकी सगळ्या गोष्टी त्याच आधारावर झाल्या पाहिजेत.

*

इतर कोणा व्यक्तीला, कोणत्याही कल्पनेला, कोणत्याही गोष्टीला, तुम्ही तुमच्या आणि ईश्वराच्यामध्ये का येऊ देता? जेव्हा तुम्ही पूर्ण अभीप्सायुक्त असता, आनंदात असता तेव्हा इतर कोणतीच गोष्ट महत्त्वाची नाही; ईश्वर आणि तुमची अभीप्सा याव्यतिरिक्त इतर कोणत्याही गोष्टीला महत्त्व देता कामा नये. जर एखाद्या व्यक्तीला ईश्वर त्वरेने, संपूर्णतः, समग्रतेने मिळावा असे वाटत असेल, तर त्या व्यक्तीचा दृष्टिकोन तसाच संपूर्ण, सर्वसमावेशक असावयास हवा. तोच त्याचा एकमेव उद्दिष्टबिंदू असावयास हवा आणि त्यामध्ये इतर कशाचीही, अगदी कशाचीही लुडबूड असता कामा नये.

ईश्वर कसा असावा, त्याने कसे वागावे, त्याने कसे वागता कामा नये, यासंबंधीच्या मानसिक कल्पनांना काहीही किंमत नाही, उलट त्या मानसिक कल्पना म्हणजे मार्गातील धोंडच ठरतात. एक ईश्वरच केवळ महत्त्वाचा आहे. जेव्हा तुमची चेतना ईश्वराला कवळून घेते, तेव्हाच खऱ्या अर्थाने ईश्वर काय आहे हे तुम्हाला समजते, त्या आधी नाही. कृष्ण हा कृष्ण आहे, त्यामुळे त्याने काय केले, काय केले नाही याला मग अशी व्यक्ती महत्त्व देत नाही तर ती व्यक्ती त्याला पाहाते, त्याला भेटते; त्याचा प्रकाश, त्याची उपस्थिती, त्याचे प्रेम, त्याचा आनंद हाच काय तो त्याच्यासाठी महत्त्वाचा ठरतो. आध्यात्मिक अभीप्सेबाबतीत नेहमी हे असेच असते – हा आध्यात्मिक जीवनाचा कायदा आहे. कोणत्याही मानसिक कल्पना किंवा प्राणिक चढउतार यांच्यावर वेळ वाया घालवू नका – ते ढग पळवून लावा. जी एकमेव आवश्यक गोष्ट आहे त्यावरच तुमचे लक्ष केंद्रित करा.

(CWSA 29 : 55-56)

*

अभीप्सा आणि खेचणे

स्वतःसाठी काही गोष्टी मिळविण्याच्या इच्छेमधून सहसा खेचून

घेणे ही प्रक्रिया घडू लागते; पण अभीप्सेमध्ये मात्र, उच्चतर चेतनेने अवतरावे आणि आपल्या अस्तित्वाचा ताबा घ्यावा म्हणून, तिच्याप्रत केलेले आत्मदान असते. जेवढी ही हाक उत्कट, तेवढे हे आत्मदान अधिक जास्त!

*

हटातटाने प्रकाश खाली आणण्याचा, त्याला खाली खेचण्याचा प्रयत्न करणे, ही खचितच एक चूक आहे. अतिमानस असे जोरजबरदस्तीने मिळविता येत नाही. जेव्हा योग्य वेळ येईल तेव्हा ते अतिमानस आपणहून स्वतःच स्वतःला प्रकट करेल. पण त्यासाठी आधी बरेच काही करावे लागेल आणि ते सुद्धा अतिशय धीराने, कोणताही उतावळेपणा न करता, करावयास हवे.

(CWSA 29 : 61)

*

अभीप्सेचा अग्नी

मार्ग कोणताही अनुसरला, तरी एक गोष्ट करणे आवश्यकच आहे आणि ती गोष्ट म्हणजे एकनिष्ठ असणे आणि लक्ष्याच्या अंतापर्यंत जाण्याची तयारी बाळगणे. तुम्ही आत्तापर्यंत बऱ्याचवेळा हा निश्चय केला आहे, त्यावर दृढ राहा. प्राणाच्या वादळांमुळे तुमच्या आत्म्याची अभीप्सा विझू देऊ नका.

(CWSA 29 : 71)

**

समर्पण

समर्पण म्हणजे काय?

ईश्वराप्रत केलेले आत्मदान म्हणजे समर्पण. व्यक्ती जे काही आहे आणि तिच्यापाशी जे काही आहे ते सारे ईश्वराला देऊ करणे; काहीही स्वत:चे नाही असे समजणे; इतर कोणतीही आज्ञा न पाळता, केवळ ईश्वरी संकल्पाच्या आज्ञेचे पालन करणे; अहंकारासाठी नाही तर,

ईश्वरासाठी जीवन व्यतीत करणे म्हणजे समर्पण.

*

जे हातचे काहीही राखून न ठेवता, स्वतःच्या सर्व अंगांनिशी ईश्वराप्रत स्वतःला देऊ करतात, त्यांना ईश्वर स्वतःलाच देऊन बसतो. आणि मग त्यांना स्थिरता, प्रकाश, शक्तिसामर्थ्य, आनंद, स्वातंत्र्य, विशालता, ज्ञानाची उत्तुंगता, आनंदसागर या गोष्टी प्राप्त होतात.

*

दिव्य शक्तीने सर्वांचा स्वीकार करावा आणि त्यात परिवर्तन घडवून आणावे म्हणून, तुमचे म्हणून जे काही आहे ते सर्व आणि तुम्ही स्वतः यांना, ईश्वराला समर्पित करणे म्हणजे आत्मसमर्पण.

*

स्वतःच्या कल्पना, इच्छा, सवयी यांचा आग्रह न धरता, सर्वत्र त्यांची जागा ईश्वरी सत्याला त्याच्या ज्ञानाद्वारे, त्याच्या इच्छेद्वारे आणि त्याच्या कार्याद्वारे घेता यावी म्हणून सहमती देणे म्हणजे समर्पण. स्वतःमध्ये जे काही आहे ते ईश्वराप्रत निवेदित करणे, व्यक्तीने ती स्वतः जे आहे ते आणि तिच्यापाशी जे काही आहे ते ईश्वराप्रत अर्पण करणे, म्हणजे समर्पण!

*

दोन शक्यता असतात. एक म्हणजे वैयक्तिक प्रयत्नांच्या द्वारे शुद्धीकरण, पण याला बराच कालावधी लागतो. दुसरी शक्यता म्हणजे ईश्वरी कृपेने त्यामध्ये थेट हात घालणे, ही कृती सहसा अधिक जलद असते. या दुसऱ्या गोष्टीसाठी संपूर्ण समर्पण, आत्मदान यांची आवश्यकता असते. आणि त्यासाठी पुन्हा कशाची आवश्यकता असते तर ती म्हणजे, ईश्वरी शक्तीस कार्य करू देईल इतपत, बऱ्यापैकी शांत राहू शकेल अशा मनाची! प्रत्येक पावलागणिक संपूर्ण एकनिष्ठ राहून, ईश्वरी शक्तीकार्यास साहाय्यकारी ठरेल असे मन असले पाहिजे, अन्यथा त्याने किमान स्थिर

व शांत तरी राहिले पाहिजे.

रामकृष्णांनी ज्या मांजरीच्या पिल्लासारख्या दृष्टिकोनाचा उल्लेख केला होता, त्या दृष्टिकोनाशी मिळतीजुळती अशी ही दुसरी अवस्था असते. ज्या व्यक्तींना, त्या जे काही करत असतात त्यामध्ये विचार आणि इच्छेच्या द्वारे खूप गतिशील हालचालींची सवय झालेली असते अशा व्यक्तींना या गतिविधी स्थिर करणे आणि मानसिक आत्मदानाची शांतता आत्मसात करणे अवघड जाते. त्यांना योगसाधना करता येणार नाही किंवा ते आत्मदानापर्यंत पोहोचू शकणार नाहीत असा याचा अर्थ नाही; मात्र शुद्धीकरण आणि आत्मदान पूर्णत्वास जाण्यासाठी त्यांना अधिक कालावधी लागतो; तेव्हा अशा व्यक्तींकडे धीर, स्थिर प्रयत्नसातत्य आणि सर्व गोष्टींच्या पार जाण्याचा निश्चय हवा, असा याचा अर्थ होय.

(CWSA 29 : 83)

*

देवावर श्रद्धा, विश्वास, ईश्वरी शक्तीप्रत आत्मदान आणि समर्पण या आवश्यक आणि अनिवार्य गोष्टी आहेत. पण देवावरील विश्वास हा, कनिष्ठ प्रकृतीच्या आवेगांप्रत शरणागती, दुर्बलता, निरुत्साह यांचा बहाणा बनता कामा नये. दिव्य सत्याच्या मार्गामध्ये जे काही आड येईल त्या सर्वांना सातत्याने नकार दिला पाहिजे; तो नकार आणि अथक अभीप्सा यांच्या समवेत त्या विश्वासाने मार्गक्रमण केले पाहिजे. ईश्वराप्रत समर्पण हे, स्वतःच्या इच्छांना, कनिष्ठ हालचालींना शरण जाण्याचे, किंवा स्वतःच्या अहंकाराला शरण जाण्याचे किंवा ईश्वराचे मायावी रूप धारण केलेल्या, अज्ञान व अंधकाराच्या कोणत्यातरी शक्तींना शरण जाण्याचे एक कारण, एक बुरखा, एक निमित्त बनता उपयोगाचे नाही.

(CWSA 29 : 87)

*

समर्पणाची प्रक्रिया

समर्पण ही काही तत्काळ करता येण्याजोगी गोष्ट नाही, ते इतके

काही सोपे नाही कारण आपल्या अस्तित्वामध्ये त्याला विरोध करणारे असेही बरेच काही असते. परंतु व्यक्तीकडे समर्पित होण्याची इच्छा मात्र असली पाहिजे. साधन बनण्याच्या बाबतीतही हीच गोष्ट लागू पडते. जर व्यक्तीकडे इच्छा असेल आणि ती श्रीमाताजींना आवाहन करेल आणि शक्य आहे तितके स्वतःला त्यांच्याप्रत खुले करेल, तर हळूहळू या गोष्टी प्रकृतीमध्ये विकसित होऊ लागतात.

(CWSA 29 : 69)

*

समर्पणाची प्रक्रिया म्हणजेच एक तपस्या आहे. इतकेच नव्हे तर, वास्तविक ती तपस्येची दुहेरी प्रक्रिया आहे; समर्पणाची प्रक्रिया आधीपासून चांगल्या रीतीने सुरु झालेली असतानाही, दीर्घकाळपर्यंत चढतेवाढते समर्पण टिकून राहते. नंतर मग एक वेळ अशी येते की, जेव्हा व्यक्तीला ईश्वरी अस्तित्व आणि ईश्वरी शक्ती सातत्याने आणि अधिकाधिक रीतीने जाणवू लागते; तीच सारे काही करत आहे असे अधिकाधिक जाणवू लागते आणि त्यामुळे अगदी अतिशय अवघड अडचणीसुद्धा ह्या जाणिवेला धक्का पोहोचवू शकत नाहीत. आणि वैयक्तिक प्रयत्नांची आता आवश्यकता उरत नाही आणि ते शक्यही होत नाहीत. प्रकृतीचे ईश्वराच्या हाती पूर्ण समर्पण झाल्याची ही खूण असते.

काही जण असेही असतात की, जे हा अनुभव येण्याच्या आधीच श्रद्धेच्या आधारे ही भूमिका घेतात. आणि जर व्यक्तीची भक्ती आणि श्रद्धा खूप बळकट असेल तर, या गोष्टी त्या अनुभवाप्रत व्यक्तीला घेऊन जातात. परंतु सर्वच जण अगदी सुरुवातीपासून अशी भूमिका घेऊ शकत नाहीत आणि कधीकधी तर हे धोकादायकसुद्धा ठरू शकते; कारण ईश्वर आहे असे समजून, त्यांनी स्वतःला एखाद्या चुकीच्या शक्तीच्या हाती, सोपवून देण्याची शक्यता असते. पण बहुतेकांच्या बाबतीत तरी, त्यांनी तपस्येच्या माध्यमातूनच समर्पणामध्ये वृद्धिंगत होणे आवश्यक असते.

(CWSA 29 : 82)

*

समर्पणाचा गाभा

मी जे काही तुम्हाला सांगू इच्छितो ते मन आणि प्राण यांचे आंतरिक समर्पण! अर्थातच बाह्य समर्पणदेखील असते. व्यक्ती जर त्या योग्यतेला पोहोचली असेल, तर मग ते मार्गदर्शन थेट प्राप्त झालेले असेल किंवा व्यक्तीला चैत्य पुरुषाचे किंवा गुरुचे मार्गदर्शन लाभत असेल, त्याचे पालन करणे, आत्म्याच्या किंवा साधनेच्या आवश्यकतेच्या जे विरोधात असेल अशा सर्व गोष्टी सोडून देणे, अर्पण करणे ह्या साऱ्या गोष्टींचा समावेश बाह्य समर्पणामध्ये होतो.

प्रायोपवेशनाचा समर्पणाशी काही संबंध आहे असे मला तरी वाटत नाही. ते अति उग्रकठोर तपस्येचे एक रूप आहे आणि माझ्या मते तरी ती अतिरेकी गोष्ट आहे, बरेचदा प्रायोपवेशन हे धोकादायक ठरू शकते. मी माझ्या पत्रामध्ये आंतरिक समर्पणाविषयी बोलत होतो.

ईश्वरावरील श्रद्धा आणि विश्वास या गोष्टी आंतरिक समर्पणाचा गाभा आहेत. ''मला दुसरेतिसरे काहीही नको, ईश्वरच हवा,'' असा दृष्टिकोन व्यक्ती अंगीकारते.

''मी ईश्वराला माझे समर्पण करू इच्छितो आणि माझ्या आत्म्याचीच ती मागणी असल्याने, इतर काहीही नाही, तर फक्त तेच. मी त्याला भेटेन, मी त्याचा साक्षात्कार करून घेईन. मी इतर काहीही मागणार नाही, केवळ हीच माझी मागणी असेल. जेणेकरून, मला त्याच्या सन्निध जाता येईल असे कार्य त्याने माझ्यामध्ये करावे; मग त्याचे ते कार्य गुप्त असेल वा प्रकट असेल, ते झाकलेले असेल वा आविष्कृत झाले असेल, मग ते कोणत्याही प्रकारचे असले तरी हरकत नाही.

मी माझ्या स्वतःच्या मार्गासाठी आणि वेळेसाठी आग्रह धरणार नाही; त्याने त्याच्या त्याच्या वेळेनुसार व त्याच्या पद्धतीने सारे काही करावे; मी त्याच्यावर विश्वास ठेवेन; त्याची इच्छा प्रमाण मानेन; त्याच्या प्रकाशाची, त्याच्या उपस्थितीची, त्याच्या आनंदाची, अविचलपणे

अभीप्सा बाळगेन; कितीही अडचणी आल्या, कितीही विलंब लागला तरी मी त्याच्यावर पूर्ण विसंबून राहीन आणि कधीही मार्ग सोडणार नाही.

माझे मन शांत होऊन, त्याच्याकडे वळू दे आणि ते त्याच्या प्रकाशाप्रत खुले होऊ दे; माझा प्राण शांत होऊ दे आणि केवळ त्याच्याकडेच वळू दे; त्याच्या शांतीप्रत आणि त्याच्या आनंदाप्रत तो खुला होऊ दे. सारे काही त्याच्यासाठीच आणि मी स्वतःसुद्धा त्याच्यासाठीच. काहीही झाले तरी, मी अभीप्सा आणि आत्मदान दृढ बाळगेन आणि हे घडून येईलच अशा पूर्ण विश्वासाने वाटचाल करत राहीन.'' व्यक्तीने हा दृष्टिकोन चढत्यावाढत्या प्रमाणात बाळगला पाहिजे. कारण ह्या गोष्टी परिपूर्णतया एकदम होणे शक्य नाही; मानसिक व प्राणिक हालचाली आड येत राहतात; पण जर व्यक्ती वरीलप्रमाणे इच्छा बाळगेल, तर त्या गोष्टी व्यक्तीमध्ये विकसित होत राहतात.

(CWSA 29 : 70-71)

**

प्रतीक आणि त्याचा अर्थ

उंट



ईश्वरी कृपेचे वरदान स्वरूप म्हणून, धीरयुक्त प्रगती आणि प्रयत्नसातत्य ह्या गोष्टी उंट या प्रतीकामधून अभिव्यक्त होतात.

(CWSA 30 : 168)

*

श्रद्धा

श्रद्धा (Faith) – गतिशील परिपूर्ण निष्ठा आणि स्वीकार.

विश्वास (Belief) – केवळ बौद्धिक स्वीकृती.

निश्चिती (Conviction) – योग्य कारण असल्याचे पटल्यामुळे निर्माण झालेला बौद्धिक विश्वास.

भरवसा (Reliance) – विश्वासाच्या आधारे, कशासाठी तरी, दुसऱ्या कोणावर तरी विसंबून असणे.

भिस्त (Trust) – दुसऱ्या व्यक्तीकडून साहाय्य मिळण्याची पक्की खात्री असणे आणि त्याच्या शब्दांवर किंवा त्याच्या चारित्र्याबद्दल खात्री असणे.

खात्री (Confidence) – विश्वासामधून येणारी एक प्रकारची सुरक्षिततेची भावना.

(CWSA 29 : 88)

*

श्रद्धा ही आंधळीच

पहिल्यांदा हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, श्रद्धा ही कोणत्याही अनुभवावर अवलंबून असत नाही. ती अशी गोष्ट आहे की जी अनुभवपूर्व असते. व्यक्ती योगसाधनेला सुरुवात करते ती अनुभवाच्या बळावर नाही, तर ती सहसा श्रद्धेच्या बळावर सुरुवात करते.

हे केवळ योगमार्ग आणि आध्यात्मिक जीवनाबाबतीतच आहे असे नाही; तर सामान्य जीवनात सुद्धा हेच लागू पडते. कार्यकर्ते, संशोधक, ज्ञाननिर्माते सुरुवात करतात ती श्रद्धेनेच आणि जोपर्यंत पुरावा सापडत नाही, किंवा ती गोष्ट घडून येत नाही तोपर्यंत निराशा आली, अपयश आले, विरोधी पुरावा सापडला, नकार मिळाला तरीदेखील ते त्या गोष्टीचा पाठपुरावा करत राहतात; कारण त्यांच्यामधीलच काहीतरी त्यांना सांगत असते की, यामध्ये तथ्य आहे, या गोष्टीचे अनुसरण केले पाहिजे, ही

गोष्ट केली पाहिजे.

आंधळी श्रद्धा ही चुकीची गोष्ट नाही का, असे रामकृष्णांना विचारले असताना ते तर पुढे जाऊन असे म्हणाले की, श्रद्धा एकाच प्रकारची असू शकते आणि ती म्हणजे आंधळी श्रद्धा. कारण श्रद्धा ही एकतर आंधळीच असते अन्यथा ती श्रद्धाच नसते, मग ती इतर काहीतरी असते – मग ते तर्कशुद्ध अनुमान, पुराव्याने सिद्ध केलेली प्रचिती किंवा स्थापित झालेले ज्ञान असते.

(CWSA 29 : 92-93)

*

योगासाठी आवश्यक असणारी मूलभूत श्रद्धा

ज्याचे अजूनपर्यंत आविष्करण झाले नाही, जे प्राप्त झाले नाही किंवा साध्य झाले नाही अशा गोष्टींकडे आत्म्याच्या साक्षीत्वाने पाहणे म्हणजे श्रद्धा. आपल्या अंतरंगामध्ये असणारा जो ज्ञाता, त्याला, कोणतेही संकेत मिळालेले नसतानासुद्धा ही जाणीव असते की, हे सत्य आहे किंवा अनुसरण्याजोगी वा प्राप्त करून घेण्याजोगी ही परमोच्च गोष्ट आहे. आपल्या अंतरंगामध्ये असणारी ही गोष्ट अशी असते की, जी मनाला निश्चित खात्री नसली, अगदी प्राण संघर्ष करत असला, बंड करत असला किंवा नकार देत असला तरीसुद्धा ती टिकून राहते.

जो योगसाधना करतो आणि तरीही अशा तऱ्हेचे, निराशेचे, अपयशाचे, अश्रद्धेचे आणि अंधाराचे दीर्घ कालावधी त्याच्या आयुष्यात आलेले नाहीत, असा कोण आहे? – पण तरीसुद्धा त्यामध्ये असे काहीतरी असते की, ज्यामुळे तो तग धरून राहतो. इतकेच नाही तर, वाटचाल करत राहतो, कारण त्याला जाणवत असते की, ज्याचे तो अनुसरण करत आहे ती गोष्ट सत्य आहे. आणि जाणवत असते म्हणण्यापेक्षा त्याला हे नक्की माहीत असते, असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. ईश्वर अस्तित्वात आहे आणि तीच एक अशी गोष्ट आहे की, जिचे

अनुसरण केले पाहिजे, त्याच्या तुलनेत जीवनातील दुसरी कोणतीच गोष्ट प्राप्त करून घेण्याजोगी नाही, ही जीवामध्ये उपजत असणारी श्रद्धाच, योगमार्गामधील मूलभूत श्रद्धा आहे.

ह्या चढत्यावाढत्या श्रद्धेमुळेच तुम्ही या योगाकडे वळला आहात आणि तुमच्यामधील ही श्रद्धा अजूनही मृत झालेली नाही किंवा मंदावलेली नाही. तुमच्या पत्रावरून असे दिसून येते की, ती अधिक आग्रही आणि अतूट झाली आहे. जोपर्यंत एखाद्या व्यक्तीमध्ये ती टिकून आहे तोपर्यंत ती व्यक्ती आध्यात्मिक जीवनासाठी निवडली गेली आहे, असे म्हणता येईल. मी तर असे म्हणेन की, त्याची प्रकृती ही कितीही अडथळेयुक्त असू दे, अडीअडचणी आणि नकारांनी ठासून भरलेली असू दे तरी, आणि अगदी अनेक वर्षे संघर्ष करत राहावा लागलेला असू दे तरीसुद्धा, व्यक्तीला आध्यात्मिक जीवनात यश मिळणार हे निश्चित.

*

तर्क आणि सामान्य जाणीव यांच्याशी सुसंगत असणारी श्रद्धा तुम्ही विकसित करणे आवश्यक आहे, – ती अशी की, जर ईश्वर अस्तित्वात आहे आणि तुम्हाला या मार्गाची हाक आलेली आहे आणि ती आलेली आहे हे निश्चित, तर मग या सगळ्या पाठीमागे ईश्वरी मार्गदर्शन असेल आणि सर्व प्रकारच्या अडीअडचणींमधूनसुद्धा पार होऊन, किंवा त्या अडीअडचणी असतानासुद्धा तुम्ही या मार्गाकडे वळालच.

अयपशाचे सूचन करणाऱ्या, (आपल्यामध्येच असणाऱ्या) विरोधी आवाजांकडे लक्ष देऊ नका किंवा त्यांना प्रतिसाद देणाऱ्या अधीर, गडबड करणाऱ्या प्राणिक आवाजांकडेही लक्ष देऊ नका. मोठमोठ्या अडचणी असणार आहेत आणि त्यामुळे यश मिळण्याची काही शक्यता नाही किंवा आजवर ईश्वराने स्वतःला कधीही प्रकट केले नाही, त्यामुळे तो पुढेही कधीच स्वतःला प्रकट करणार नाही, यासारख्या म्हणण्यावर मुळीच विश्वास ठेवू नका. उलट, ज्यांनी आपले मन हे एका अतिशय महान

आणि अवघड ध्येयावर केंद्रित केलेले असते, अशा लोकांप्रमाणे तुम्ही अशी भूमिका घ्या की, ''मला यश मिळेपर्यंत मी वाटचाल करतच राहीन आणि मग भलेही कितीही अडचणी येवोत, मी यशस्वी होईनच होईन.''

यामध्ये ईश्वरनिष्ठ मनुष्य अजून एक भर घालतो, ''ईश्वर अस्तित्वात आहे, तो आहेच आणि जर का तो अस्तित्वात आहेच तर, मग मी त्याचे जे अनुसरण करत आहे, त्यामध्ये कधीही अपयश येऊ शकणार नाही. मला जोवर तो गवसत नाही, तोवर कितीही दुःखसंकटे आली तरी, त्यांवर मात करून, मी वाटचाल करतच राहीन.''

(CWSA 29 : 91-94)

*

प्रकाशाशी एकनिष्ठता

आत्मप्रकाशाशी आणि ईश्वरी हाकेशी एकनिष्ठ राहण्यासंबंधी मी जे बोलत होतो त्यामध्ये, मी तुमच्या गतायुष्यातील कोणत्या गोष्टीविषयी किंवा तुमच्यामधील एखाद्या उणिवेविषयी बोलत नव्हतो. तर सर्व संघर्षामध्ये, हल्ल्यांमध्ये आवश्यक असणाऱ्या एका गोष्टीकडे निर्देश करत होतो – सत्यप्रकाशाला, सत्याच्या हाकेला विरोध करणाऱ्या कोणत्याही सूचना, आवेग, प्रलोभन यांचे म्हणणे ऐकण्यास नकार देण्याच्या आवश्यकतेकडे, मी निर्देश करत होतो.

सर्व शंकाकुशंका आणि निराशेच्या वेळी असे म्हणावे की, ''मी ईश्वराचा आहे, मी अपयशी होऊ शकणार नाही.'' अशुद्धतेच्या आणि अपात्रतेच्या सर्व सूचनांना उत्तरादाखल म्हणावे की, ''मी ईश्वराने निवडलेले अमर्त्यतेचे बालक आहे. मी फक्त माझ्याशी आणि ईश्वराशी प्रामाणिक असावयास हवे, तर विजय निश्चित आहे; अगदी मी जरी पडलो, धडपडलो तरी मी खात्रीने पुन्हा उभा राहीन.'' कोणतेतरी कनिष्ठ ध्येय पूर्ण करण्यासाठी, या उच्च्तर ध्येयापासून दूर जाऊ पाहणाऱ्या सर्व आवेगांना उत्तर द्यावे की, ''हे सर्वात महान असे ध्येय आहे. माझ्या

अंतरंगात वसणाऱ्या आत्म्याचे समाधान करू शकेल असे हे एकमेव सत्य आहे; या दिव्यत्वाच्या प्रवासामध्ये कितीही परीक्षा आणि संकटांना सामोरे जावे लागले, तरी मी धीराने ध्येयापर्यंत पोहोचेनच.'' 'प्रकाशाशी आणि हाकेशी एकनिष्ठता' याचा मला अभिप्रेत असणारा अर्थ हा होता.

(CWSA 29 : 99)

*

केंद्रवर्ती श्रद्धेची आवश्यकता

श्रीअरविंद : मी बलवान अशा केंद्रवर्ती आणि शक्यतो परिपूर्ण श्रद्धेविषयी तुमच्याशी बोललो; कारण तुम्ही फक्त परिपूर्ण अशा प्रतिसादाचीच तमा बाळगता असे दिसते. म्हणजे इतर साऱ्या गोष्टी तुम्हाला समाधान देणाऱ्या नाहीत; साक्षात्कार, ईश्वरी अस्तित्व यांचेच तुम्हाला मोल आहे. मात्र ते तुम्हाला तुमच्या प्रार्थनेमधून गवसत नव्हते. परंतु निव्वळ प्रार्थनेद्वारे या गोष्टी लगेचच प्राप्त होतील, असे सहसा घडत नाही. जर का केंद्रामध्ये ज्वलंत श्रद्धा असेल किंवा अस्तित्वाच्या सर्व भागांमध्ये परिपूर्ण श्रद्धा असेल तरच तसे घडून येते.

परंतु ह्याचा अर्थ असा मुळीच होत नाही की, ज्यांची श्रद्धा तितकी खंबीर नाही, किंवा ज्यांचे समर्पण परिपूर्ण नाही ते तिथवर पोहोचूच शकत नाहीत. परंतु मग बहुतेक वेळा, त्यांना आधी छोट्या छोट्या पायऱ्या पार कराव्या लागतात; आणि जोवर प्रयत्नसातत्याद्वारे किंवा तपस्येद्वारे पुरेसे खुलेपण प्राप्त होत नाही तोवर, त्यांच्या प्रकृतीच्या समस्यांना त्यांना सामोरे जावे लागते. अगदी डळमळणारी श्रद्धा आणि संथ, आंशिक समर्पण ह्यांचीसुद्धा स्वतःची म्हणून काहीएक शक्ती असते, त्यांचे स्वतःचे असे काही परिणाम असतात. तसे नसते तर, अगदी मोजक्याच लोकांना साधना करणे शक्य झाले असते.

केंद्रवर्ती श्रद्धा म्हणजे आत्म्याच्या वर किंवा मागे असलेल्या केंद्रवर्ती अस्तित्वावर श्रद्धा असे मला म्हणावयाचे आहे. ही अशी श्रद्धा असते

की, जेव्हा मन शंका घेते, प्राण खचून जातो, आणि शरीर ढासळू पाहते तेव्हाही ही श्रद्धा टिकून असते. आणि जेव्हा हा हल्ला संपतो, तेव्हा ही श्रद्धा पुन्हा उसळून येते आणि पुन्हा एकदा मार्गावर वाटचाल करण्यास व्यक्तीला प्रवृत्त करते. ती बळकट आणि तेजस्वी असू शकते, ती फिकी, दिसायला दुबळी अशी असू शकते; पण तरीदेखील ती प्रत्येक वेळी सतत टिकून राहिली, तर मग ती खरीखुरी श्रद्धा होय.

निराशा आणि अंधकाराचे झटके ही साधनामार्गावरील एक परंपराच आहे. पौर्वात्य आणि पाश्चात्त्य योगमार्गांमध्ये तो जणू काही एक नियमच असल्यासारखे दिसते. मला ते स्वतःलादेखील ज्ञात आहे. पण माझ्या अनुभवातून मला असे उमगले की, ह्या अनावश्यक परंपरा आहेत आणि व्यक्तीने जर ठरविले तर, व्यक्तीची त्यापासून सुटका होऊ शकते. म्हणूनच जेव्हा केव्हा या गोष्टी तुमच्यामध्ये किंवा इतरांमध्ये आलेल्या मला आढळतात, तेव्हा मी त्यांना श्रद्धेच्या शिकवणीपुढे उचलून घेऊ पाहतो. आणि तरीसुद्धा जर निराशा आणि अंधकाराचे झटके आलेच तर, व्यक्तीने शक्य तितक्या त्वरेने त्यातून बाहेर पडावे आणि स्वच्छ सूर्यप्रकाशात पुन्हा यावे.

(CWSA 29 : 95-96)

*

ईश्वरी साक्षात्कारासाठी लागणारा कालावधी

ईश्वरी कृपेविषयी कोणतीच शंका घेण्याचे कारण नाही. जर माणूस प्रामाणिक असेल तर तो ईश्वरापर्यंत पोहोचेलच, हे म्हणणेही अगदी खरे आहे. पण याचा अर्थ असा नाही की, तो अगदी लगेचच, सहजपणे, कोणताही विलंब न लागता पोहोचेल. इथेच तुमची चूक होत आहे. तुम्ही देवासाठी पाच वर्षे, सहा वर्षे, अमुक इतकी वर्षे असा कालावधी नेमून देत आहात आणि अजूनपर्यंत कोणताच परिणाम दिसत नाही म्हणून त्याविषयी शंका घेत आहात. एखादी व्यक्ती ही केंद्रवर्ती दृष्टीने प्रामाणिक

असू शकते आणि तरीही तिच्यामध्ये अशा अनेक गोष्टी असू शकतात की, ज्या गोष्टींमध्ये, साक्षात्कार होण्यापूर्वी परिवर्तन घडविण्याची आवश्यकता असते. त्याच्या प्रामाणिकपणामुळे तो नेहमीच चिकाटी बाळगण्यास सक्षम झाला पाहिजे. कारण ही ईश्वराप्रत असणारी इच्छाच अशी असते की, जी कशामुळेही मावळू शकत नाही. विलंबामुळे, निराशेमुळे, कोणत्या अडचणीमुळे किंवा इतर कोणत्याही गोष्टीमुळे ही इच्छा मावळता कामा नये.

(CWSA 29 : 117)

**

प्रयत्नसातत्य

पूर्णयोगामध्ये धीराची आवश्यकता

पूर्णयोगासारख्या योगाला धीराची आवश्यकता असते कारण, ह्या योगामध्ये, प्रेरणांमधील आमूलाग्र बदल, प्रकृतीच्या प्रत्येक भागामध्ये आणि तपशीलांमध्ये परितर्वन या दोन्ही गोष्टींचा समावेश होतो. ''काल याच वेळेस मी श्रीमाताजींप्रत संपूर्ण आत्मदान करावयाचा निश्चय केला आणि बघा, तसे काहीच झालेले नाहीये; तर उलट, सगळ्या विरोधी गोष्टी पुन्हा एकदा उफाळून आल्या आहेत; तेव्हा आता अन्य काही नाही, मी योगासाठी अपात्र आहे असे गृहीत धरून, योगमार्गाचा त्याग करावयास हवा,'' असे म्हणणे योग्य नाही.

अर्थात, जेव्हा तुम्ही (संपूर्ण आत्मदान करण्याच्या निश्चयापाशी) अशा प्रकारचा काही निश्चय करण्याच्या मुद्द्यापाशी येऊन पोहोचलेले असता तेव्हा, मार्गामध्ये अडथळा येईल अशा साऱ्या गोष्टी ताबडतोब वर उफाळून येतात – हे असे अगदी हमखास घडते.

अशा वेळी, मागे सरायला पाहिजे, त्या गोष्टींचे निरीक्षण करून, त्यांचा त्याग करावयास हवा; अशा गोष्टींना तुमचा ताबा घेण्यास तुम्ही संमती देता कामा नये; तुम्ही तुमची मध्यवर्ती इच्छा त्यांच्यापासून अलिप्त

अशी राखली पाहिजे आणि त्यांना सामोरे जाण्यासाठी श्रीमाताजींच्या शक्तीला आवाहन केले पाहिजे. आणि तरीसुद्धा जर व्यक्ती त्यामध्ये गुंतून पडली आणि असे बरेचदा घडते, तर अशा वेळी शक्य तितक्या त्वरेने त्यापासून अलिप्त होऊन, पुढे वाटचाल केली पाहिजे. प्रत्येक जण, प्रत्येक योगी हे असेच करत असतो. प्रत्येक गोष्ट त्वरेने करावयास जमत नाही म्हणून निराश होणे, हे जडभौतिक सत्याच्या काहीसे विरोधी आहे. व्यक्तीचे स्खलन झाले म्हणजे, याचा अर्थ ती अपात्र आहे असा होत नाही. तसेच एखाद्या गोष्टीमध्ये एखादी अडचण दीर्घकाळ टिकून राहिली, तर ती गोष्ट त्या व्यक्तीसाठी अशक्यच आहे, असाही याचा अर्थ होत नाही.

जेव्हा तुम्ही निराश होता, तेव्हा तुम्हाला तुमचे नेहमीचे काम सोडून देणे भाग पडते, याचा अर्थ असा नाही की, तुम्ही स्थिरता प्राप्त करून घेतलेली नाही. तर याचा अर्थ एवढाच की, जी स्थिरता तुम्हाला प्राप्त झाली आहे, ती स्थिरता हा तुमचा वैयक्तिक गुण नाही तर, तुम्ही श्रीमाताजींशी जो संपर्क राखू शकता, त्यावर तो गुण अवलंबून आहे. कारण त्याच्या पाठीशी आणि तुम्ही जी काही प्रगती करू शकता, त्या सर्व प्रगतीच्या पाठीशी श्रीमाताजींची शक्ती असते. त्या शक्तीवर अधिकाधिक विसंबून राहायला शिका, त्या शक्तीप्रत अधिकाधिक पूर्णतेने स्वतःला खुले करा आणि ज्या आध्यात्मिक प्रगतीसाठी तुम्ही प्रयत्नशील असता, ती प्रगतीसुद्धा स्वतःसाठी नाही तर ईश्वराखातर करत आहात, हे लक्षात ठेवा – जर असे केलेत, तर तुम्ही या मार्गावर सहजतेने प्रगत होऊ शकाल. अगदी बाह्यवर्ती शारीर जाणिवेमध्येसुद्धा पूर्णपणे चैत्य खुलेपणा राखा.

(CWSA 29 : 113-114)

*

वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया खालील ई–मेलवर कळवाव्यात, ही विनंती.
editorabhipsa2018@gmail.com

अहंकारापासून सुटका

तुम्ही म्हणताय की अनेक वर्षे झाली तरी तुमच्या प्रकृतीमध्ये काहीच बदल झाला नाहीये. इतक्या कमी कालावधीत बाह्य प्रकृती बदलणे इतके सोपे असते तर अजून काय हवे होते? तुम्ही मूळ प्रश्नच विसरत आहात. प्रकृतीमध्ये सर्वव्यापक असणाऱ्या अहंकारापासून सुटका करून घेणे, ह्या कार्याला तर अगदी अलीकडेच तुम्ही गांभीर्याने हात घातला आहे. आणि ही काही इतक्या कमी महिन्यांमध्ये साध्य होणारी गोष्ट नाही. मोठमोठ्या साधकांना बरेच अनुभव आल्यानंतर, उच्चतर पातळ्यांवर मोठाले बदल घडून आल्यानंतर मग जाणवते की, येथे अजून बरेच काही करावयाचे बाकी आहे. इतर सगळेजण जशी अपेक्षा बाळगतात, तशीच तुम्हीसुद्धा, यापासून (अहंकारापासून) ताबडतोब सुटका होईल अशी अपेक्षा कशी काय बाळगता?

(CWSA 29 : 113-114)

*

आशा, औत्सुक्य आणि श्रद्धा

अधिक गहन आणि आध्यात्मिक अर्थाने सांगावयाचे तर, सघन साक्षात्कार म्हणजे असा साक्षात्कार की, ज्यामुळे ज्याचा साक्षात्कार झाला आहे ती गोष्ट, इतर कोणत्याही भौतिक गोष्टीपेक्षाही अधिक वास्तव आणि गतिशील आणि जाणिवेच्या दृष्टीने अगदी निकट उपस्थित असते. अशा प्रकारे वैयक्तिक ईश्वराचा किंवा अवैयक्तिक ब्रह्माचा किंवा आत्म्याचा साक्षात्कार हा सहसा, साधनेच्या प्रारंभीच किंवा साधनेच्या पहिल्या काही वर्षांत होत नाही किंवा अनेक वर्षांतदेखील होत नाही. असे फारच थोड्यांच्या बाबतीत घडते. लंडनमध्ये योगपूर्व अनुभव आल्यानंतर, पंधरा वर्षांनी म्हणजे, मी योगसाधनेला सुरुवात केल्यानंतर, पाचव्या वर्षी मला तो अनुभव आला. आणि तो सुद्धा माझ्यादृष्टीने खूप असाधारणरित्या लवकरच आलेला आहे, जणू द्रुत आगगाडीचा वेगच. अर्थात, यापेक्षाही

अधिक लवकर काही उपलब्धी घडून आल्या आहेत, यात शंका नाही. पण इतक्या लवकर त्याची अपेक्षा बाळगणे आणि त्याची मागणी करणे आणि अनुभव आला नाही म्हणून वैतागून जाणे आणि युगामध्ये दोन तीन व्यक्तींचा अपवाद वगळता, इतरांना हा योग करता येणे अशक्य आहे असे घोषित करणे, ही गोष्ट एखाद्या अनुभवी योग्याच्या किंवा साधकाच्या दृष्टीने, उतावळ्या आणि विकृत अधीरतेमध्ये गणली जाईल.

बहुतेक जण हेच सांगतील की, पहिल्या काही वर्षांमध्ये धीम्या गतीने विकासाची आशा बाळगणे हे चांगले. आणि जेव्हा प्रकृती तयार होते आणि जेव्हा ती पूर्णपणे ईश्वराभिमुख होते, तेव्हाच असे निर्णायक अनुभव येऊ शकतात. काही जणांच्या बाबतीत तुलनेने अगदी सुरुवातीच्या काळात असतानादेखील, काही पूर्वतयारी करून घेणारे अनुभव अपेक्षेपेक्षा लवकर येऊ शकतात, पण तेथेही जाणिवेच्याा परिश्रमापासून त्यांची सुटका नसते; जाणिवेच्या या परिश्रमांमुळे मग पुढे, अशा अनुभवांची, चिरस्थायी आणि परिपूर्ण अशा साक्षात्कारामध्ये परिणती होते.

मला तुमची मागणी वा दृष्टिकोन आवडतो का आवडत नाही, याचा इथे काही प्रश्नच नाहीये. कारण पसंती–नापसंती, या दोन्ही गोष्टींमुळे मी सहसा प्रभावित होत नाही. आणि इथे तर हा वास्तव, सत्य आणि अनुभव यांचा प्रश्न आहे, पसंती–नापसंतीचा नाही. वास्तविक, जी माणसं कृतज्ञ असतात, आनंदी असतात; आवश्यकता पडली तर, अगदी छोटी छोटी पावले का असेनात, पण एकेक पाऊल टाकण्याची ज्यांची तयारी असते, अशी माणसं खरंतर अधिक वेगाने वाटचाल करतात आणि आणि जे प्रत्येक पावलागणिक निराश होतात, कुरकुर करत राहतात अशा अधीर, उतावळ्या लोकांपेक्षा ही माणसं अधिक खात्रीने वाटचाल करतात. मला तरी नेहमी असेच आढळून आले आहे – याला विरोधी अशीही काही उदाहरणे असतील, आणि तुम्ही त्यातील एक असायला माझी काही हरकत नाहीये – अजिबातच नाही. मला एवढेच सांगावयाचे आहे की,

जर तुम्ही 'आशा, औत्सुक्य आणि श्रद्धा' कायम बाळगू शकलात तर, तेथे अधिक मोठ्या शक्यतेला वाव असेल, इतकेच.

(CWSA 29 : 112)

*

दृढ संकल्प

अधिक गंभीरपणे सांगावयाचे तर, अमुक अमुक गोष्ट करावयाची आहे हे एकदाच कायमचे ठरवून टाका; तुमच्यासाठी या पृथ्वीवर करण्याजोगी तीच एकमेव गोष्ट शिल्लक राहिली आहे. मग बाकी भूकंप, हिटलर, ढासळती सभ्यता, पूरात वाहत गेलेला कोल्हा.. इ. इ. बाह्य गोष्टी आहेतच. आणखी असे की, जी गोष्ट तुम्ही करणे आवश्यक आहे, ती तुम्हाला करता यावी म्हणून तुमच्या साहाय्यासाठी एक गोष्टदेखील पाठविलेली आहे. तुम्ही म्हणता, तुम्ही ठरविलेली ती गोष्ट अवघड आहे, मार्ग दूरवरचा आहे आणि त्यामानाने देण्यात आलेले प्रोत्साहन अल्प आहे पण म्हणून काय झाले? एवढी मोठी गोष्ट एवढ्या सहजासहजी मिळावी किंवा एकतर त्यात अगदी वेगाने यश प्राप्त व्हावे, नाहीतर नकोच, अशी अपेक्षा तुम्ही का बाळगता? अडचणींना सामोरे गेलेच पाहिजे आणि जेवढ्या आनंदाने तुम्ही त्यास सामोरे जाल, तेवढ्या लवकर तुम्ही त्या अडचणींवर मात करू शकाल. ''ही गोष्ट मी केलीच पाहिजे का? आणि मी तशी इच्छा बाळगली आहे का?'' असा यशाचा मूलमंत्र, विजयाचा निर्धार, दृढ संकल्प कायम राखणे हीच एक गोष्ट केली पाहिजे. अशक्यता अशी कोणती गोष्टच मुळात अस्तित्वात नाही. हां, अडचणी असू शकतात, गोष्टींना वेळ लागू शकतो, पण अशक्य असे काही नाही. व्यक्तीने एकदा का अमुक एक गोष्ट करण्याचा दृढ निश्चय केला की, आज ना उद्या ती शक्य होते.

(CWSA 29 : 115-116)

*

सर्वात जवळचा मार्ग

ईश्वराप्रत जाण्याचा ध्यान हा एक मार्ग आहे, तो महान मार्ग आहे; पण तो जवळचा मार्ग आहे, असे म्हणता येणार नाही. कारण तो खूप उच्च स्तरावर घेऊन जाणारा असला, तरीही तो बहुतेकांसाठी खूप लांबचा आणि अवघड मार्ग असतो. जर त्यामुळे अवतरण घडून आले नाही तर, तो जवळचा मार्ग आहे असे कदापिही म्हणता येणार नाही आणि तेव्हासुद्धा, म्हणजे अवतरण घडून येते तेव्हासुद्धा लवकर होते ती फक्त पायाभरणीच! नंतर त्या पायावर ध्यानाच्या आधारे, मोठ्या परिश्रमाने एक भली मोठी इमारत उभारावी लागते. हे अगदी अनिवार्य आहे, पण ह्याला जवळचा मार्ग असे म्हणता येईल, असे त्यात काही नाही.

कर्म हा तुलनेने बराच साधासरळ मार्ग आहे – परंतु, त्यामध्ये व्यक्तीचे मन ईश्वराला वगळून, फक्त कर्मावरच खिळलेले असता कामा नये. ईश्वर हे साध्य असले पाहिजे आणि कर्म हे केवळ एक साधन असले पाहिजे.

काव्यादींचा उपयोग आपल्या आंतरिक अस्तित्वाच्या संपर्कात येण्यासाठी असतो आणि त्या संपर्काचा उपयोग आपल्या आंतरतम अस्तित्वाच्या थेट संपर्कात येण्यासाठी तयारी म्हणून होतो, पण व्यक्तीने तेथेच थांबता कामा नये, व्यक्तीने सद्‌वस्तुपर्यंत जाऊन पोहोचायला हवे. जर व्यक्ती स्वतःला साहित्यिक किंवा कवी, चित्रकार समजत असेल आणि साहित्य साहित्यासाठी, कला कलेसाठीच असे मानत असेल तर, ही काही योगिक वृत्ती नाही. आणि म्हणूनच मी कधीकधी असे म्हणत असतो की, आपले काम हे योगी बनणे आहे; केवळ कवी, चित्रकार बनणे हे नाही.

प्रेम, भक्ती, समर्पण, चैत्य खुलेपणा हे ईश्वराप्रत पोहोचण्याचे सर्वात जवळचे मार्ग आहेत किंवा असू शकतात. कारण प्रेम आणि भक्ती ह्या गोष्टी जर जास्त प्राणप्रधान असतील तर, हर्षभरित अपेक्षा आणि

विरह, अभिमान आणि नैराश्य या गोष्टींमध्ये दोलायमान स्थिती होण्याची शक्यता असते आणि त्यामुळे हा मार्ग जवळचा न राहता, दूरवरचा, वळणावळणाचा होतो. ईश्वराकडे धाव घेण्याऐवजी, थेट झेपावण्याऐवजी, एखादा स्वतःच्या अहंकाराच्या भोवती भोवती घोटाळत राहण्याची शक्यता असते.

(CWSA 29 : 212)

*

ईश्वरविषयक प्रेम

ईश्वराभिमुख झालेले प्रेम हे, ज्याला माणसं प्रेम हे नाव देतात, तशाप्रकारचे नेहमीचे प्राणिक भावना असणारे प्रेम असता कामा नये. कारण ते प्रेम हे प्रेमच नसते, तर ती केवळ एक प्राणिक इच्छा असते, एक प्रकारची स्वीकृतीची सहजबुद्धी असते, मालकीची आणि एकाधिकाराची प्रेरणा असते. हे तर दिव्य प्रेम असतच नाही; पण योगमार्गामध्ये यातील अंशभागाचीही भेसळ होता कामा नये.

ईश्वरविषयक प्रेमामध्ये आत्मदान असते, ते कोणत्याही मागणीपासून मुक्त असते; ते शरणागती आणि समर्पणाने परिपूर्ण असते; ते कोणतेही हक्क गाजवत नाही; ते कोणत्याही अटी लादत नाही; ते कोणताही सौदा करत नाही; मत्सर, अभिमान वा राग यांच्या उद्रेकामध्ये ते गुंतून पडत नाही, कारण या गोष्टी त्याच्या घडणीतच नसतात.

आणि त्याच्या बदल्यात दिव्य मातादेखील स्वतःला देऊ करते, पण अगदी मुक्तपणे – आणि आंतरिक वरदानामध्ये ती गोष्ट प्रतिबिंबित झालेली दिसते. दिव्य मातेचे अस्तित्व तुमच्या मनामध्ये, तुमच्या प्राणामध्ये, तुमच्या शारीरिक जाणिवेमध्ये प्रतिबिंबित झालेले दिसते. तिची शक्ती तुमच्या अस्तित्वाच्या सर्व गतिविधी हाती घेऊन, त्यांना पूर्णत्व आणि परिपूर्तीच्या दिशेने घेऊन जात, दिव्य प्रकृतीमध्ये तुमची पुनर्निर्मिती करते. तिच्या प्रेमाने तुम्हाला कवळून घेतले आहे आणि ती

स्वतः तुम्हाला तिच्या बाहुंमध्ये घेऊन, ईश्वराकडे घेऊन जात आहे असे तुम्हाला जाणवते.

अगदी तुमच्या जडभौतिक अंगापर्यंत तुम्हाला याची संवेदना व्हावी आणि तिने तुमचा ताबा घ्यावा अशी अभीप्सा तुम्ही बाळगली पाहिजे. आणि इथे मात्र कोणतीही मर्यादा असत नाही, ना काळाची ना समग्रतेची! जर तुम्ही खरोखर अशी अभीप्सा बाळगलीत आणि जर ती तुम्हाला साध्य झाली तर, इतर कोणत्याही दाव्यांना किंवा अपूर्ण राहिलेल्या इच्छावासनांना जागाच नाही. आणि जर व्यक्ती खरोखरच अशी अभीप्सा बाळगेल तर, आणि जसजशी व्यक्ती अधिकाधिक शुद्ध होत जाईल, तसतसा आवश्यक असणारा बदल तिच्या प्रकृतीमध्ये घडून येईल, तसतशी निश्चितपणे व्यक्तीला ती गोष्ट साध्य होईलच.

कोणतेही स्वार्थी हक्क आणि इच्छा यांच्यापासून मुक्त असे तुमचे प्रेम असू द्या; मग जेवढी तुमची क्षमता आहे, जेवढे तुम्ही ग्रहण करू शकता, तेवढे सर्व प्रेम प्रतिसादरूपाने तुम्हाला मिळत आहे; असे तुम्हाला आढळेल.

(CWSA 29 : 338-339)

*

साधे सहज राहा.

आपण खूपच जटिलनेते भरलेल्या वातावरणात राहत असतो, पण अशी एक जागा नेहमीच असते की, जिथे सारे काही खुले, साधे, सरळ असते – हे अनुभवलेले सत्य मी सांगत आहे.

तुम्ही गोल गोल फिरत राहता, धडपड करत राहता, त्यावर काम करत राहाता आणि मग कुठेतरी कुंठित झाल्यासारखे होते; आणि अशा वेळी तुमच्या आंतरिक दृष्टिकोनातून तुम्हाला एखादा मार्ग गवसतो आणि सारे काही मोकळे होते – अगदी सहजतेने हे होते. मला असा अनुभव बऱ्याच वेळेला आलेला आहे.

....श्रीअरविंद नेहमी म्हणत, ''साधे राहा, साधे असा. जे तुम्हाला भावते तसेच साधेपणाने बोला. साधे असा, साधे असा.'' पहिल्यांदा जेव्हा हे शब्द त्यांनी उच्चारले, तेव्हा एक प्रकाशपथच माझ्यासमोर खुला होताना मला दिसला आणि सारे काही खूप साधे–सोपे होऊन गेले. 'एक पाऊल, मग दुसरे पाऊल, हेच केवळ आपल्याला करावयाचे आहे,' असे मला जाणवून गेले.

श्रीमाताजी स्वतःच्या कपाळाकडे निर्देश करत म्हणतात, सारी जटिलता इथे आहे, खूप जटिल, त्याच्याशी मिळतेजुळते घेणे खूप अवघड आहे. जेव्हा श्रीअरविंद 'साधेसरळ असा', असे म्हणाले, तेव्हा काय आश्चर्य – तेव्हा जणू काही त्यांच्या डोळ्यांमधून प्रकाश बाहेर पडत होता आणि अचानकपणे व्यक्ती जणू प्रकाशाच्या बागेतच उदयाला यावी तसे काहीसे झाले. जणू काही ती बाग प्रकाशात न्हाऊन निघाली होती. साध्या गोष्टीवर केवढा मोठा भर दिला होता त्यांनी! तुम्हाला जे दिसते, तुम्हाला जे माहीत आहे तेच साधेपणाने बोला, अगदी साधे, सहज. अगदी साधेपणा.

साधेसरळ असणे असे ते ज्याला म्हणत आहेत, ती म्हणजे अगदी आनंददायी उत्स्फूर्तता, सहजता आहे. कृतीमध्ये, अभिव्यक्तीमध्ये, प्रत्येक हालचालीमध्ये, जीवनामध्ये साधे असा, साधे असा, सरळ असा. एक आनंदी अशी सहजता. ते ज्याला 'दैवी स्थिती' असे म्हणतात ती उत्क्रांतीमधील सहजस्वाभाविक व आनंदी अवस्था आपण पुनर्प्राप्त करून घ्यावी, अशी श्रीअरविंदांची आपल्याकडून अपेक्षा आहे. आणि मी जेव्हा हे ऐकले, मी जेव्हा हे पाहिले, तेव्हा सुवर्ण प्रकाशाचा जणू एक झराच वाहत होता, जणू एक सुगंधित बाग असावी असे काहीसे ते होते. सारे, सारे, सारे काही मोकळे होते.

(Conversations with a disciple: September 16, 1961)

**

Punica granatum.

फुलाचा आध्यात्मिक अर्थ

दिव्य प्रेम

(डाळिंबाचे फूल अगदी वाळवंटामध्येदेखील बहरते.)

या विश्वामध्ये दिव्य प्रेम आणि सौंदर्य आणि आनंद उतरविणे हा, खरेतर आपल्या योगाचा मुकुट आहे, ते आपल्या योगाचे सार आहे.

–श्रीअरविंद

(CWSA 29 : 333)

ईश्वरी प्रेम हे सर्वांवरच असते, ते प्रत्येकाच्या प्रगतीसाठी समानत्वानेच कार्यकारी असते; परंतु ज्यांना त्याचे मोल आहे त्यांच्याबाबतीत ते विजयी होते.

–श्रीमाताजी

(CWM 14 : 131)

*

आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमशः)

२४ एप्रिल १९६८

वस्तुमात्रांच्या आध्यात्मिक व्यवस्थेमध्ये, आपण जितक्या उच्च स्तरावर आपला दृष्टिकोन आणि आपली अभीप्सा उंचावत नेतो, तेवढ्या वाढत्या प्रमाणात आपल्यामध्ये ते सत्य अवतरू पाहते. कारण मुळातच ते आपल्यामध्ये आहे आणि या आविष्कृत झालेल्या प्रकृतीमध्ये ते झाकले गेले आहे आणि त्यामुळे त्या आवरणांपासून मुक्तता व्हावी, म्हणून ते साद घालत राहते.

(CWSA 21-22 : 284)

*

१५ ऑगस्ट १९६८

खरोखरच सार्वत्रिक विघटनाचा काळ असे म्हणता येईल अशा या काळात, नाऊमेद न होता राहावयाचे झाले तर, व्यक्तीकडे स्थिरचित्त हृदय, स्थिर संकल्प आणि संपूर्ण आत्म–परित्याग असला पाहिजे; तसेच दृष्टी ही सातत्याने पारलौकिकावर खिळलेली असली पाहिजे.

(CWSA 36 : 285)

*